# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५८५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२२/०९/२०१६

**१) अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्याच्या प्रयत्न करुन तिचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २१/०९/२०१६ रोजी १०.०० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही शाळेत जात असतांना यातील आरोपीने तीचा पाठलाग केला. व तिच्यावर अत्याचार करण्याच्या हेतुने फिर्यादी समक्ष फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीचा हात पकडुन तिच्यासी वैयक्तीक परस्पर अत्याचार वृध्दीगत करण्याचा प्रयत्न केला व तिचा विनयभंग केल्याने फिर्यादीची तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४(अ)(ड), भांदवि. सहकलम १२ बाल लैगिक संरक्षण. कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. तोडासे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) अल्पवयीन मुलगा घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २१/०९/२०१६ रोजी १०.३० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगा हा शाळेत जातो म्हणुन घरून निघुन गेला तो घरी परत आला नाही त्याला कोणीतरी अज्ञात आरोपीने पळवुन नेले असावे असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन व शासकीय परिपत्रका प्रमाणे पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) टाटा सुमो गाडीची आयटेनला धडक लागुन वाहनाचे नुकसान झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २१/०९/२०१६ रोजी १०.०० वा. दर. यातील फिर्यादी हा आपली आयटेन गाडी क्र. एमएच ३६ एच ६२०६ ने भंडारा कडुन कारधा कडे एनएच ०६ रोडने जात असतांना वैनगंगा नदीच्या पुलीया नंतर मागेहुन येणा—या यातील आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने, लापरवाहीने चालवुन मागेहुन कारधा येथे धडक दिल्याने वाहनाचे १०,०००/—रू. ते १२,०००/—रू. चे नुकसान केल्याने फिर्यादी शशीकांत दामोधर तिडके वय ४१ वर्ष रा. सिल्ली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,४२७ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**४) वाम व भष्ट मार्गाचा वापर करुन लाचेची मागणी केली. :—**

दिनांक. २१/०९/२०१६ रोजी १३.१५ वा. दर. यातील आरोपीने आपल्या पदाचा स्वत:च्या आर्थीक लाभा करीता वाम व भ्रष्ट मार्गाचा वापर करुन तक्रारदार सौ. योगीता भगवान धकाते वय ३८ वर्ष, रा. कस्तुरबा गांधी वार्ड भंडारा यांना आपल्या मुलाची दुस—या शाळेत ६ व्या वर्गामध्ये प्रवेश घेतल्याने त्या करीता त्याची इयत्ता ५ वीची शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (टि.सी)देण्याकरीता २००/—रु. ची लाचेची मागणी करुन २००/—रु. लाच रक्कम स्विकारल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ७,१३,(१)(ड),१३(२) लाच लुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस निरीक्षक. कुल्लरवार एसीबी. भंडारा पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) दारूडया वाहन चालकांवर कारवाई. :—**

दिनांक २१/०९/०१६ रोजी १६.००ते १७.०० वा. दरम्यान यातील आरोपीने आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ८७७२ चा चालक हा दारु पिवुन दारुचे नशेत जवाहर गेट पवनी येथे चालवितांनी मिळुन आला, त्याचे ब्रिथ अलकोहल ॲनालॉझर मशिनव्दारे चेक केले असता अलकोहल प्रमाण मिळुन आले व डॉ. परीक्षण रिपोर्ट वरुन सर तर्फे फिर्यादी पोना. रामटेके पो.स्टे. पवनी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

६) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :—

दिनांक २१/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. तुमसर, साकोली, लाखनी, भंडारा व सिहोरा येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५० लिटर हातभटट्री दारू कि. ५,०००/—रु. तसेच ०४ लिटर १४० मिली लिटर देशी दारू कि. ६,२५०/—रू. तसेच जुगारातुन कि. ३,०८८ /—रु. असा एकुण ९,३३८/—रू. चा माल जप्त करण्यात आला

७) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक २१/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १०६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२ केसेस, तिन सिटर वाहनांवरती १० केसेस व ईतर वाहनांवरती ९४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.